**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**
**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

कोविमं/डीपी/प्रकटन/2961
दिनांक - २४/०१/२०२४

प्रति,
०१) मा. जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी कार्यालय,
सातारा / सांगली / कोल्हापूर.
०२) मा. संचालक,
आकाशवाणी केंद्र,
सातारा / सांगली / कोल्हापूर.
०३) मा. संचालक,
बी न्यूज कोल्हापूर.
०४) मा. संचालक,
एस न्यूज, कोल्हापूर.
०५) मा. संपादक,
दै. पुढारी / सकाळ / तरुण भारत / लोकमत / पुण्यनगरी
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रुवारी/मार्च २०२४ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या वाढीव वेळेबाबत.**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२ वी) परीक्षा दि.२१/०२/२०२४ ते दि.१९/०२/२०२४ तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान या विषयाची ऑनलाईन परीक्षा दि.२०/०३/२०२४ ते २३/०३/२०२४ व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) दि.०१/०३/२०२४ ते दि.२६/०३/२०२४ या कालावधीत तसेच इ.१२ वी प्रात्यक्षिक परीक्षा दि.०२/०२/२०२४ ते दि.२०/०२/२०२४ व इ.१० वी प्रात्यक्षिक परीक्षा दि.१०/०२/२०२४ ते दि.२९/०२/२०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) फेब्रुवारी/मार्च २०२४ च्या परीक्षेसाठी द्यावयाच्या दहा मिनिटे वाढीव वेळेबाबतच्या प्रकटनाची प्रत या पत्रासोबत जोडली आहे. सदर प्रकटनास आपल्या लोकप्रिय दैनिकातून तसेच आकाशवाणी व दुरदर्शन केंद्रानी त्यांच्या प्रादेशिक बातम्यातून विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

सोबत: प्रकटन

**(सुभाष रा.चौगुले)**
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव-
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये व माध्यमिक शाळा
जिल्हा सातारा, सांगली, कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

## प्रकटन

**विषय :–** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी–मार्च २०२४ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या वाढीव वेळेबाबत.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणा–या परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी (आकलन होण्यासाठी) परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वाटप परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर करण्यात येत होते.

इ. १० वी व इ. १२ वी च्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वपूर्ण टप्पा असल्यामुळे पालक व समाज घटक यांचे या परीक्षांकडे बारकाईने लक्ष असते. परंतु प्रश्नपत्रिका मोबाईलवर तसेच अन्य समाज माध्यमातून व्हायरल झाल्याच्या अफवा व काही अंशी अशा घटना निदर्शनास आलेल्या आहेत.

अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध व्हावा तसेच परीक्षा निकोप, भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात सुरळीत पार पडाव्यात यासाठी परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरीत करण्याची सुविधा फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून रद्द करण्यात आलेली होती.

**तथापि विद्यार्थी हित लक्षात घेवून व पालक, विद्यार्थी यांच्या मागणीचा विचार करून सदरची दहा मिनिटे परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर गतवर्षीप्रमाणे फेब्रुवारी–मार्च २०२४ परीक्षांसाठी खालीलप्रमाणे वेळ वाढवून देण्यात येत आहे.**

फेब्रुवारी–मार्च २०२४ परीक्षांचे वेळीही सकाळ सत्रात स. ११.०० वाजता तसेच दुपार सत्रात दु. ३.०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल व लेखनास प्रारंभ होईल.

सकाळ सत्रात स. १०.३० वाजता तसेच दुपार सत्रात दु. २.३० वाजता परीक्षार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

| | परीक्षेची सध्याची वेळ | परीक्षेची सुधारित वेळ |
|---|---|---|
| सकाळ सत्र | स. ११.०० ते दु. २.०० | स. ११.०० ते दु. २.१० |
| | स. ११.०० ते दु. १.०० | स. ११.०० ते दु. १.१० |
| | स. ११.०० ते दु. १.३० | स. ११.०० ते दु. १.४० |
| दुपार सत्र | दु. ३.०० ते सायं. ६.०० | दु. ३.०० ते सायं. ६.१० |
| | दु. ३.०० ते सायं. ५.०० | दु. ३.०० ते सायं. ५.१० |
| | दु. ३.०० ते सायं. ५.३० | दु. ३.०० ते सायं. ५.४० |

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

दिनांक – २३/०१/२०२४.

D:\Govt Letter.docx